ग्रामपंचायत अधिकारी या पदावर जिल्हा परिषद सेवेमध्ये पुन:स्थापित करणे बाबत.(श्री.राजेंद्र बन्सीधर वळेकर तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत साकत,नान्नज व जायभायवाडी तालुका जामखेड)

जिल्हा परिषद अहिल्यानगर
ग्रामपंचायत विभाग

आदेश क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/ई.क्र. ९८०३९३४

दिनांक - ०५ / ०८ /२०२५

संदर्भ- १. या कार्यालयाचे आदेश ई ऑफीस क्रमांक.१०६०९५२ /२०२५ दिनांक २६/०३/२०२५ (सेवा निलंबन आदेश)

२. या कार्यालयाचे ज्ञापन. ई ऑफीस क्रमांक १३५३६६६ दिनांक २१/०६/२०२५

३. गट विकास अधिकारी जामखेड यांचे पत्र आस्था-२/५१/ दिनांक २५/०६/२०२५ चे पत्र (श्री.वळेकर यांना ज्ञापन बजावले दिनांक २४/०६/२०२५)

४. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्र. निप्रआ-११२२/प्र.क्र.०९/विचौ-२/ दिनांक- २२ एप्रिल २०२५

संदर्भ क्रमांक ०१ चे आदेशान्वये श्री.राजेंद्र बन्सीधर वळेकर तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत साकत,नान्नज व जायभायवाडी तालुका जामखेड कार्यरत तालुका पंचायत समिती कोपरगाव यांना कार्यालयीन कामकाजात संशयीत अपहार व कर्तव्यात कसुर करण्याचे गैरवर्तन केल्याने जिल्हा परिषद सेवेतुन सेवानिलंबित करणेत आलेले आहे.

संदर्भ क्र.०२ चे ज्ञापनान्वये श्री.राजेंद्र बन्सीधर वळेकर तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत साकत,नान्नज व जायभायवाडी तालुका जामखेड यांचे गैरवर्तना बाबत एकुण ०६ दोषारोप ठेवून शिस्तभंग विषयक कार्यवाही सुरु करण्या बाबत दोषारोप बजावण्यात आलेले आहेत.

संदर्भ क्रमांक ०४ चे शासन निर्णयानुसार श्री. राजेंद्र बन्सीधर वळेकर, सेवा निलंबीत ग्रामपंचायत अधिकारी यांचा सेवा निलंबन कालावधी तीन महिन्यापेक्षा अधिक झालेला असल्याने, तसेच त्यांना या गैरवर्तन बाबत दोषारोप बजावणशात आलेले असून शिस्तभंगविषक कारवाई प्रस्तावित असुन प्रकरणी त्यांचे सेवानिंलबन प्रकरणाचा आढावा घेण्यात आलेला असुन या निलंबन प्रकरणी श्री.राजेंद्र बन्सीधर वळेकर यांचे सेवानिलंबन या पुढे चालू न ठेवण्याचा व जिल्हा परिषद सेवेमध्ये पुन:स्थापित करण्याचा निर्णय घेण्यात येत आहे.

सबब महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ चे पोट नियम ३(५) नुसार, प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन मी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर तथा सक्षम प्राधिकारी जिल्हा परिषद अहिल्यानगर या आदेशान्वये श्री.राजेंद्र बन्सीधर वळेकर, तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत साकत,नान्नज व जायभायवाडी तालुका जामखेड यांना ग्रामपंचायत अधिकारी या पदावर जिल्हा परिषद सेवेत पंचायत समिती ---------- कर्जत ------------------------येथे पुन:स्थापित करीत आहे.

श्री. राजेंद्र बन्सीधर वळेकर, सेवानिलंबीत ग्रामपंचायत अधिकारी, पंचायत समिती जामखेड यांचा या सेवा निलंबन कालावधीचा निर्णय, पुढील सुरु असलेली शिस्तभंगविषयक कार्यवाही पुर्ण झालेनंतर स्वतंत्ररित्या घेण्यात येईल.

जिल्हा परिषद सेवेत पुन:स्थापित करणेचे आदेशाची नोंद श्री. राजेंद्र बन्सीधर वळेकर , सेवानिलबीत ग्रामपंचायत अधिकारी यांचे मुळ सेवा पुस्तकात संबधीत खाते प्रमुख यांनी ध्यावी .

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२५०७०५०८००८ ............ असा आहे.

Signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 05-07-2025 13:18:56
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्री.राजेंद्र बन्सीधर वळेकर तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत साकत,नान्नज व जायभायवाडी तालुका जामखेड. (सेवानिलंबन मुख्यालय पंचायत समिती श्रीगोंदा)

व्दारा :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती श्रीगोंदा.

प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती श्रीगोंदा

२/-सोबतचा आदेश संबधीतास बजावून तो मिळालेबाबतची पोहच कार्यालयास अहवाल सादर करावी.

प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती जामखेड यांना पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.

प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती ---------कर्जत----------

२/- श्री.राजेंद्र बन्सीधर वळेकर सेवानिलबीत ग्रामपंचायत अधिकारी हे हजर झालेनंतर अहवाल इकडेस सादर करावा.

( स्वाक्षरीत/-)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर